**नियमीत दिवाणी दावा क्रमांक १०३/२०२०**
निवृत्ती / युवराज
**निशाणी क्रमांक ३२ खाली**

**वादी तर्फे साक्षीदार क्रमांक १ अंगद निवृत्ती हेळकर यांचा शपथेवर पुढील सरतपास विधीज्ञ श्री. डी. ए. निकाळजे यांच्यामार्फत**

**३३.** माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. मी स्वतःसाठी व वादी क्रमांक ३ व ४ यांनी माझ्या हक्कात दिलेल्या मुखत्यारपत्राच्या आधारे साक्ष देत आहे. मुखत्यारपत्राची छायांकित प्रत मी दाखल केली असून त्यावर प्रतिवादी क्रमांक ३ व ४ यांच्या सही व अंगठा आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. मुखत्यारपत्र आर्टिकल अ वर आहे. सबब, मुखत्यारपत्राची मुळ प्रत दुसऱ्या न्यायालयीन प्रकरणात दाखल आहे. माझी आई छबुबाई निवृत्ती हेळकर हिच्या नावे असलेले मृत्यूप्रमाणपत्र ची प्रमाणित प्रत दाखल केली असून ती **निशाणी क्रमांक ४८** वर आहे. प्रस्तुत दाव दाखल करण्यापुर्वी आम्ही वादींनी प्रतिवादींना दिनांक २३.०६.२०१५ रोजी वकीलांमार्फत नोटीस पाठवून दिली होती त्या नोटीसची कार्यालयीन प्रत मी दाखल केली असून त्याव माझी व माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकुर माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहे. नोटीसची प्रत **निशाणी क्रमांक ४९** वर आहे. सदरची नोटीसा मी प्रतिवादींना रजिस्टर पोस्टाने पाटवून दिली होती. पोस्टाच्या दोन पावत्या दाखल केल्या असून त्या **निशाणी क्रमांक ५०** वर आहेत. माझे वडील निवृत्ती संतु हेळकर यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची छायांकित प्रत दाखल केली असून ती प्रत आर्टिकल 'ब वर आहे.

**प्रतिवादी तर्फे उलटतपास विधीज्ञ. श्री. एस. बी. देवकते यांच्याकडून**

**३४.** माझे वडील निवृत्ती हेळकर हे हयात असताना त्यांच्या नावे गट क्रमांक ४४० मधील ४० आर जमीन होती. गट क्रमांक ४४१ मधील ८१ आर क्षेत्र माझ्या नावे असून अज्ञानपालकर्ता म्हणून आईचे नाव लावण्यात आले होते. गट क्रमांक ४४० मधील वडीलांच्या नावे असलेल्या जमिनी व्यतिरिक्त उर्वरीत जमीन माझा भाऊ भारत हेळकर याच्या नावे १२ आर क्षेत्र होते. सन २००७ मध्ये गट नंबर ४४० मधील जमीन माझे वडील निवृत्ती यांच्या नावे होती आणि गट नंबर ४४१ मधील ८१ आर जमीन माझ्या नावे होती. हे म्हणणे खरे आहे की गट क्रमांक ४४० व गट क्रमांक ४४१ मधील जमिनी माझ्या आईवडीलांनी त्यांच्या स्वकष्टार्जित उत्पन्नातून खरेदी घेतलेल्या होत्या.

**३५.** हे म्हणणे खरे आहे की माझे आईवडील दोघे मयत झाले आहेत. हे म्हणणे खरे आहे की आम्ही वादी व प्रतिवादी बोरिवली, मुंबई येथे राहण्यास होतो. हे म्हणणे खरे आहे की दिनांक ०७.०५.२००७ रोजी माझे आईवडीलांनी प्रतिवादीच्या नावे गट क्रमांक ४४० मधील ५० आर क्षेत्र खरेदीदस्त क्रमांक ७८१/२००७ अन्वये करुन दिलेले होते. साक्षीदार स्वतः सांगतो की, व्याजाच्या रक्कमेच्या सुरक्षेपोटी करुन दिलेले होते. हे म्हणणे खरे आहे की दिनांक ०९.०५.२००७ रोजी माझे आईवडीलांनी प्रतिवादीच्या नावे गट क्रमांक ४४१ मधील ८१ आर क्षेत्र खरेदीदस्त क्रमांक ८०१/२००७ अन्वये करुन दिलेले होते. साक्षीदार स्वतः सांगतो की, व्याजाच्या रक्कमेच्या सुरक्षेपोटी करुन दिलेले होते. हे म्हणणे खरे आहे की पहिल्या खरेदीखताच्या वेळी प्रतिवादीने माझ्या आईवडीलांना मोबदल्याची रक्कम रुपये ६५,०००/– आणि दुसऱ्या खरेदीखताच्या वेळी मोबदल्याची रक्कम १,०६,०००/– माझ्या आईवडीलांना दिलेले होते. हे म्हणणे खरे नाही की वरनमुद दोन्ही खरेदीखताच्या वेळी माझ्या आईवडीलांना दोन्ही जमिनीचा ताबा प्रतिवादीस दिलेला होता. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादींनी वर नमुद दोन्ही जमिनी पुन्हा आम्हाला बटईने करण्यासाठी दिलेले होते.

**३६.** हे म्हणणे खरे आहे की वर नमुद खरेदीखताच्या आधारे प्रतिवादीच्या नावे फेर मंजुर होण्यासाठी तसा अर्ज त्याने महसूल अधिकारी यांच्याकडे दिलेला होता. हे म्हणणे खरे नाही की फेरफारची कारवाई प्रलंबित असताना आम्ही वादींनी संगणमत करुन नियमीत दिवाणी दावा क्रमांक १९८/२००९ वाटपासाठी दाखल करुन न्यायालयाची दिशाभुल करुन तडजोडीने हुकूमनामा करुन घेतलेला होता. साक्षीदार स्वतः सांगतो की वर नमुद दाव्यातील हुकूमनाम्याच्या आधारे वाद जमिनीचे वाटप झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की वर नमुद तडजोड हुकूमनाम्याच्या आधारे आम्ही वादींनी आमच्या नावे फेर मंजुर करुन घेतलेला आहे. साक्षीदार स्वतः सांगतो प्रतिवादी यांच्याशी सल्लामसलत करुन वरीलप्रमाणे फेर मंजुर करुन घेतला होता.

**३७.** हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादींनी आमच्या विरोधात नियमीत दिवाणी दावा क्रमांक २८९/२०२० दाखल केला असून तो दावा न्यायप्रविष्ठ आहे. हे म्हणणे खरे नाही की वाद जमिनीचे दोन्ही खरेदीदस्त माझ्या आईवडीलांनी प्रतिवादीच्या हक्कात कायम खुश खरेदी म्हणून करुन दिलेले असल्याकारणाने ते दोन्ही खरेदीदस्त आम्हा वादींवर बांधनकारक आहेत. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी हा मुंबई येथे राहत असल्याकारणाने त्याच्या गैरहजेरीत जमिनीवर बेकायदेशीर ताबा ठेवण्याचा आम्ही वादींनी प्रयत्न केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही

की आम्ही प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2025.12.24 16:38:30 +0530

दिनांकः–२४.१२.२०२५

**अ. अ. शेख**

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 24-12-2025 |
| Order signed by the presiding officer on | - | 24-12-2025 |
| Order uploaded on | - | 24-12-2025 |